**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

## परिषदा, कार्यशाळा, चर्चासत्रे व परिसंवादासाठी संलग्नित महाविद्यालयांना आर्थिक सहाय्य
## संलग्नित महाविद्यालयांनी अर्थसहाय्याचा लाभ घेण्याचे आवाहन

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना परिषदा, कार्यशाळा, चर्चासत्रे व परिसंवाद आदींच्या आयोजनाकरीता विद्यापीठाच्या साधारण निधीमधून आर्थिक सहाय्य देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. आर्थिक सहाय्याची मागणी करण्याकरिता अर्ज सादर करण्याच्या दोन तारखा निश्चित करुन त्या ३१ ऑगस्ट व ३१ डिसेंबर आहे.

आर्थिक सहाय्य देण्याकरिता विहित प्रपत्राचा नमुना व इतर दस्तऐवज विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर युनिव्हर्सिटी पब्लीकेशन्स मध्ये सर्क्युलर्स यावर जावून १९-फायनन्स फ्रॉम युनिव्हर्सिटी फंड फॉर कॉन्फरन्सेस ... डिपार्टमेन्टस् येथे उपलब्ध आहे. अशाप्रकारचे आर्थिक सहाय्य देण्यात येत असल्याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाच्या विकास विभागाने सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पाठविले आहे. अधिक माहितीसाठी विकास विभागाचे उपकुलसचिव श्री विक्रांत मालवीय (८३०८०२८२६०) यांचेशी संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दि. ०१/११/२०२१.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी